# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:03.09.2025** **वार:बुधवार**

1. भारतातील सर्वात लहान सेमीकंडक्टर चिप जगात सर्वात मोठा बदल घडवेल-पंतप्रधानांचा विश्वास
2. मराठा समाजाला कुणबी जातीचं प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी गावपातळीवर समित्या स्थापन करण्याचा निर्णय
3. सात दिवसांच्या गणपतींसोबत माहेरवाशीण गौरींना भावपूर्ण निरोप, ठिकठिकाणी पर्यावरणपूरक पद्धतीनं विसर्जनाची व्यवस्था आणि
4. राज्याच्या विविध भागांमध्ये वीजा आणि जोराच्या वाऱ्यांसह मुसळधार पावसाचा इशारा

**<u>पंतप्रधान-सेमीकॉन</u>**

भारतातील सर्वात लहान सेमीकंडक्टर चिप जगात सर्वात मोठा बदल घडवेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत सेमिकॉन इंडिया-2025 या संमेलनाचं उद्घाटन करताना व्यक्त केला. जगाचा भारतावर विश्वास आहे आणि भारतासोबत सेमिकॉनर्सचं भविष्य घडवण्यास तयार असल्याचं सांगून मोदी म्हणाले की 2021 पासून मंजूर झालेल्या 10 सेमीकंडक्टर प्रकल्पांमध्ये 18 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली जात आहे. जागतिक सेमीकंडक्टर बाजारपेठ भविष्यात एक ट्रिलियन डॉलर्सची पातळी ओलांडेल आणि भारताचा वेग पाहता देश या बाजारपेठेत महत्त्वपूर्ण वाटा उचलेल असं मोदी म्हणाले...

**सेमीकंडक्टर की दुनिया में एक बात कही जाती है। ऑयल्स वाज ब्लैक गोल्ड बट चिप्स आर डिजिटल डॉयमंड्स। 21वीं शताब्दी की शक्ति छोटे से चिप में सिमट करके रह गई है। यह चिप भले ही छोटी सी है लेकिन इसमें दुनिया की प्रगति को बड़ी गति देने की ताकत है और इसलिए ही आज सेमीकंडक्टर का ग्लोबल मार्केट 600 बिलियन डॉलर पर पहुंच रहा है. यहां दुनिया भर में सेमीकंडक्टर से जुड़े एक्सपर्ट्स हैं। 40-50 से ज्यादा देशों का यहां रिप्रेजेंटेशन है और भारत की इनोवेशन और यूथ पावर भी यहां नज़र आ रही है और यह जो कॉम्बिनेशन बना है, उसका एक ही मैसेज है द वर्ल्ड ट्रस्ट इंडिया, बिलीव्स इन इंडिया एंड द वर्ल्ड इस रेडी टू बिल्ड दी सेमीकंडक्टर फ्यूचर विद इंडिया।**

**<u>आरक्षण</u>**

हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचं प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी गावपातळीवर समित्या स्थापन करण्याचा निर्णय काल घेण्यात आला. मराठा समाजातील भूधारक तसंच भूमिहीन, शेतमजूर किंवा बटईनं शेती करत असलेल्या व्यक्तींकडे शेत जमिनीची मालकी असल्याचा पुरावा नसल्यास त्यांनी 13 ऑक्टोबर 1967 पूर्वीचं वास्तव्य दाखविणारं प्रतिज्ञापत्र सादर करायचं आहे. तसंच, त्यांच्या कुळातील किंवा नातेसंबंधातील व्यक्तींना कुणबी जातीचं प्रमाणपत्र मिळालं असल्यास आणि त्यांनी अर्जदारासंबंधी प्रतिज्ञापत्र दिल्यास, स्थानिक समिती आवश्यक चौकशी करून अहवाल सादर करेल. सक्षम प्राधिकारी या चौकशीच्या आधारे अर्जदाराला कुणबी जातीचा दाखला देण्याचा निर्णय घेतील. याबाबत कार्यपध्दती करण्यात आलेला शासन निर्णयात नमूद करण्यात आली आहे. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे यांची भेट घेऊन त्यांना हैदराबाद गॅझिटियरबाबत शासनानं तयार केलेला मसुदा दाखवला. यानंतर जरांगे यांनी मुंबईत सुरू असलेलं आंदोलन मागं घेत असल्याची घोषणा केली.

न्यायालयातही हा निर्णय टिकेल असा संवैधानिक तोडगा काढण्यात यश आल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली...

**ज्यांचा खरा क्लेम आहे पण कागदपत्रांच्या अभावी त्यांना तो क्लेम मिळत नव्हता अशा मराठा समाजाच्या लोकांना आता याचा फायदा मिळणार आहे. त्यामुळे मला असं वाटतं की एक मराठा समाजाकरता अतिशय चांगला निर्णय आणि विशेषतः, हा सगळा प्रश्न सर्वाधिक मराठवाड्यामध्ये होता. कारण मराठवाड्यात रेकॉर्ड्स नाहीयेत आणि म्हणून मराठवाड्याकरता हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होता आणि मराठवाड्यातून इतरही भागांमध्ये राहायला गेलेले जे लोकं आहेत त्यांच्याकरता महत्त्वाचा होता. मला असं वाटतं की त्याच्यावर एक संवैधानिक तोडगा आम्ही काढू शकलो आहोत. एक असा तोडगा काढू शकलो आहोत की जो कोर्टातही टिकेल आणि त्यातनं लोकांना फायदा होईल.**

**गणपती**

सात दिवसांच्या गणपतींबरोबर काल राज्यभरात माहेरवाशीण गौरींनाही निरोप देण्यात आला. तत्पूर्वी त्यांना पुरणावरणाचा नैवेद्य दाखवण्यात आला. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भासह सर्वत्र गौरीपूजनाचा पारंपरिक उत्साह दिसून आला. पर्यावरणपूरक पद्धतीनं गणेश विसर्जन करण्याबाबतही जागरुकता वाढत असल्याचं दिसून येत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका आणि स्वराज्य महाराष्ट्र या संस्थेच्या वतीनं मूर्तीदानाविषयी जनजागृती करण्यात येत आहे. या अंतर्गत चिंचवडगाव परिसरात काल दुपारपर्यंत 1176 गणेश मूर्तींचं दान तर चार टन निर्माल्य स्वीकारण्यात आलं. आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये पथकं तयार करण्यात आली असून प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती दान करण्याविषयी नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्ह्यात साडे चार लाखपेक्षा अधिक मूर्ती पर्यावरणपूरक पद्धतीनं विसर्जित करण्यात आल्या. गेल्या अनेक वर्षांपासून कोल्हापुरात सुरू असलेल्या मूर्तीदान उपक्रमाला यावर्षीही नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. निर्माल्य आणि मूर्ती दान करून पर्यावरणपूरक विसर्जन चळवळ वृध्दींगत केली.

पुण्यातील पूर्व भागातील कस्तुरे चौक गणेशोत्सव मंडळानं गणपती बघायला येणाऱ्या भाविकांना प्रसादासोबत देशी झाडांचे एक हजारपेक्षा जास्त बीज गोळे दिले. यासोबतच देशी झाडांच्या बिया देखील वाटण्यात आल्या. कार्यकर्त्यांनी देशी झाडांचं रोपण आणि संवर्धनाचा संकल्प करत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनाही त्याचं महत्त्व पटवून दिलं. नांदेडमध्ये 250 गणेश मंडळांनी डीजे न वाजविण्याचं हमीपत्र दिलं आहे. प्रशासनातर्फे या मंडळांचा गौरव करण्यात आला.

**पोर्टल**

राज्य गणेशोत्सवाच्या अंतर्गत आयोजित 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धे'चा यावर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला आहे. 404 मंडळांनी स्पर्धेत आतापर्यंत सहभाग नोंदविला असून स्पर्धेचं परीक्षण सहभागी तालुक्यांमध्ये सुरू आहे.

**नागपूर**

महामेट्रोनं नागपुरमध्ये कामठी मार्गावरील सर्वात लांब डबल डेकर उड्डाणपुलाची निर्मिती केली असल्याची नोंद गिनीज बुकमध्ये करण्यात आली आहे. या पुरस्कारामुळं नागपूरची नवीन ओळख निर्माण झाली असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथं एका कार्यक्रमात काढले आणि महामेट्रोच्या अधिकाऱ्यांचं अभिनंदन केलं.

**एसटी**

राज्य सरकारनं एस.टी. महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनींच्या व्यापारी तत्त्वावर वापरासंदर्भात निर्णय घेतला आहे. त्यानुसार सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून विकसित होणाऱ्या प्रकल्पाच्या भाडेपट्टीची मुदत 60 वर्षांवरून 98 वर्षांपर्यंत वाढवण्यात आली आहे अशी माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी काल दिली. या

निर्णयामुळं महामंडळाच्या ताब्यातील निष्क्रिय जमीन उपयुक्त वापरात आणली जाईल आणि नव्या प्रकल्पांना चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

**<u>सदनिका-पालघर</u>**

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील रमाबाई अपार्टमेंट या इमारतीचा मागील भाग चाळीवर कोसळून झालेल्या दुर्घटनेत 17 रहिवाशांचा मृत्यू झाला होता तर 9 रहिवासी जखमी झाले. या दुर्घटनाग्रस्त रहिवाशांना देण्यासाठी विरारमधल्या म्हाडा संकुलातील 60 सदनिका म्हाडाकडून तात्पुरत्या स्वरूपात महानगरपालिका प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत.

**<u>शाळा-लातूर</u>**

लातूर शहरात अनधिकृतपणे सुरू असलेल्या चैतन्य प्री प्रायमरी स्कूलला शिक्षण विभागाद्वारे काल टाळं ठोकून बंद करण्यात आलं. या शाळेला शिक्षण विभागाची आणि शासनाची कसलीही मान्यता नसतानाही ही शाळा सुरू होती.

**<u>रोरो-सिंधुदुर्ग</u>**

मुंबईतून कोकणात अवघ्या काही तासांत नेणाऱ्या बहुप्रतीक्षित रो-रो सेवेची चाचणी काल मुंबई ते जयगड आणि विजयदुर्ग या सागरी मार्गावर घेण्यात आली. कोकणातून प्रवासी बोट सेवा बंद झाल्यांनतर 35 वर्षांनी अशी चाचणी होत असल्यानं काही ज्येष्ठ नागरिक त्यावेळच्या बोटसेवेच्या आठवणीत बुडाले होते. या रोरो सेवेद्वारे प्रवाशांना आपल्या वाहनासह प्रवास करता येणार आहे.

**<u>निधन</u>**

सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड इथले ज्येष्ठ रंगकर्मी मुकुंद कुलकर्णी यांचं नुकतंच निधन झालं. ते 81 वर्षांचे होते. एकपात्री प्रयोगांसह तीन अंकी नाटक आणि राज्य नाट्य स्पर्धा अशा विविध रंगमंचांवर त्यांनी आपली कला सादर केली. विविध नाट्य संस्था आणि कलाकारांना त्यांनी सामावून घेतलं.

**<u>हवामान</u>**

मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भ, कोकण, आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट भागातही अति मुसळधार पाऊस पडेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.